म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9200



कांहींतरी नवेंच करा!

BVBK-0401240
BVBK-0401240

# भारत-कवि टागोर

# भारत-कवि टागोर

•

वि. उ. वैद्य

कांहीं तरी नवेंच करा : २७

१२४० दि. २०।५।७
बा. वां.

BVBK-0401240
BVBK-0401240

पन्नास नये पैसे

वोरा अँण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.
मुंबई २.

श्री : १८५
♣

© १९५९
वोरा ॲण्ड कंपनी
पब्लिशर्स प्रा. लि.

♣
प्रकाशक :
अ. ल. गाडगीळ,
वोरा ॲण्ड कंपनी,
पब्लिशर्स प्रा. लि. करितां
३, राउंड बिल्डिंग,
काळबादेवी रोड,
मुंबई २.
♣
आवृत्ति दुसरी :
१९६२
♣
मूल्य : ५० नये पैसे
♣
मुद्रक :
अनंत जे. शाह,
लिपिका प्रेस,
कुर्ला रोड, अंधेरी.



कविवर्य रवींद्रनाथ ठाकूर यांना जग 'कविसम्राट' म्हणतें. हें 'कविसम्राट' पद त्यांना त्यांच्या 'गीतांजलि' या थोर काव्यसंग्रहामुळें लाभलें. परंतु आमच्या राष्ट्रीय दृष्टीनें, आमच्या प्राचीन भारतीय आदर्श कविपरंपरेप्रमाणें खरा भारत-कवि कसा असावा याचें रवींद्रनाथ ठाकूर हें आधुनिक काळांतील आदर्श उदाहरण आहे. याच अर्थानें त्यांच्या या छोट्याशा चरित्राला भारत-कवि टागोर असें म्हटलें आहे.

☆

# भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ ठाकूर

卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐 卐

आपली भारतमाता भाग्यवान् आहे. आतांपावेतों शतकाशतकांत तिनें असंख्य थोर सुपुत्रांना जन्म दिला. त्या सुपुत्रांनीं भारताचें नांव विविध तऱ्हेनें जगांत गाजविलें आहे. कोणी अखिल जगाला मार्गदर्शन करणारे तत्त्वज्ञ होते, तर कोणी विविध शास्त्रांत महान् संशोधक होते. मुत्सद्दी, नाटककार, कवि, संत, कलावंत, चित्रकार व शिल्पकार या विविध नात्यांनीं या भारतीय महापुरुषांनीं भारतमातेची कीर्तिगंगा अक्षय फोफावत ठेवली आहे व निर्मळ ठेविली आहे. ही पवित्र गंगा थेट आपल्या काळापर्यंत, विसाव्या शतकाच्या पूर्वार्धापर्यंत ज्यांनीं आणून आपल्या मायभूला धन्य केलें त्या महापुरुषांमध्यें महाकवि रवींद्रनाथ टागोर यांना अग्रस्थान द्यावें लागेल.

**सुवर्णाक्षरांनीं लिहिलेली घटना**

१९१३ या वर्षीं भारताचें नांव शब्दशः जगभर दुमदुमत होतें. जगांत असा देश नव्हता व असा एकहि सुशिक्षित नव्हता कीं ज्याला रवींद्रनाथ टागोर व त्यांचा भारत माहीत नव्हता. असें काय अद्‌भुत त्या वर्षीं घडलें ?

१९१२ मध्यें रवींद्रनाथांनीं आपल्या 'गीतांजली'तील कांहीं गीतांचीं इंग्रजी भाषांतरें प्रसिद्ध केलीं. तीं वाचून आयरिश कवि यीट्स् यांना अतिशय आश्चर्य वाटलें.

एका पौर्वात्यानें इंग्रजींत उच्च दर्जाचें व नाविन्यपूर्ण काव्य लिहावें या गोष्टीचें सर्वत्र भारी कौतुक झालें. इंग्लंडमध्यें खळबळ उडाली ! सर्व युरोपियन भाषांतून गीतांजलीचीं भाषांतरें झालीं. सर्व जगांत गीतांजलीचे हजारों वाचक दिसूं लागले. कांहींना तर गीतांजलीनें वेडे केलें ! जगद्विख्यात कवि म्हणून रवींद्रांना कीर्ति लाभली. इंग्लंड-अमेरिकेच्या वृत्तपत्रांतून त्यांच्या मुलाखती येऊं लागल्या.

बाहेरच्या देशांचीं विजयपत्रें घेऊन रवींद्रनाथ १९१३ मध्यें स्वदेशीं परत आले. इतक्यांत स्वीडनमधील विद्वत्सभेनें "गीतांजली हा काव्यग्रंथ जगांत शांति उत्पन्न करणारा आहे" असें ठरवून त्या ग्रंथाला जगद्विख्यात 'नोबेल पारितोषिक' दिलें. सव्वा लाख किमतीचें व सर्व जगांत रवींद्रांना व भारताला अमर कीर्ति प्राप्त करून देणारें हें नोबेल पारितोषिक जाहीर झाल्याबरोबर सर्व भारतीय आनंदानें व अभिमानानें थय्थय् नाचूं लागले ! भारतीय जनतेनें महोत्सव केला. युरोप, अमेरिका व जपान या राष्ट्रांतील मित्रांकडून तारांचा, पत्रांचा व स्तुतिपाठांचा वर्षाव झाला. सिमल्यास श्री. अँड्रूज यांचें रवींद्रांच्या काव्यावर व्हाइसरॉय लार्ड हार्डिंज यांच्या अध्यक्षतेखालीं व्याख्यान झालें. समारोपाच्या भाषणांत अध्यक्षांनीं 'आशिया खंडाचे कविसम्राट' (Poet Laurate of Asia) असा रवींद्रांचा बहुमानानें गौरव केला. रवींद्रांनीं पाश्चिमात्यांना जिंकलें. आणि हें अद्भुत १९१३ मध्यें घडलें.

## लक्ष्मी–सरस्वतीचें वरदान

कविसम्राटांचें मूळ आडनांव ठाकूर. इंग्रजांनीं त्याचें टागोर हें अपभ्रष्ट रूप रूढ केलें ! आणि तेंच पुढें सर्वत्र वापरलें जाऊं लागलें. बंगालमधील हें ठाकूर घराणें विद्वत्ता, श्रीमंती, दानधर्म, तत्त्वज्ञान, साहित्य, संगीत व चित्रकला इत्यादींचें माहेरघर म्हणून कित्येक वर्षें प्रसिद्ध आहे. अशा थोर कुलांत रवींद्र जन्मले व त्यांनीं भारतवर्षांतच नव्हे तर सर्व जगांत आपल्या घराण्याची कीर्ति पसरविली.

रवींद्रांचे आजोबा द्वारकानाथ बुद्धिमान व असाधारण कर्तबगारीचे गृहस्थ होते. त्यांच्या वेळेस बंगालमध्यें कोणत्याहि तऱ्हेच्या शाळा नसतांनाहि त्यांनीं इंग्रजी, फारसी, अरबी या भाषांचें ज्ञान संपादन केलें. शिवाय कायद्याचा अभ्यास केला व व्यापारी ज्ञान मिळविलें. आपल्या देशाचा व्यापारविषयक कारभार परक्यांच्या हातीं असल्याचें पाहून त्यांना फार दुःख होई. व्यापारी ज्ञान संपादन केल्यावर त्यांनीं व्यापारांत लक्ष घातलें व दरमहा लाखों रुपये नफा मिळविला. पुढें पुढें तर दीड दोन लाख मासिक दानधर्म करावा इतकी त्यांची प्राप्ति वाढली. त्यांच्या दानशूरपणामुळेंच तर त्यांना ‘ राजा ’ द्वारकानाथ म्हणत! गुणीजनांचा परामर्ष घेण्याचें व्रत त्यांनीं अव्याहत पाळलें. जुन्या धार्मिक समजुतींना धक्का देऊन त्यांनीं दोन वेळां विलायतचा प्रवास केला. १८४६ मध्यें विलायतेची सफर करीत असतांना तिकडेच ते दिवंगत झाले.

रवींद्रांचे वडील देवेंद्रनाथ हे महर्षि म्हणून ओळखले जात. ऋषितुल्य पवित्र वागणूक, निरिच्छ वृत्ति, वैदिक वाङ्मयाचा अभ्यास व ईश्वरचिंतन यामुळें 'महर्षि' ही पदवी लोकांनीं होऊनच त्यांना दिली. देवेंद्रनाथ हे हिमालयांत एका आश्रमांत दोन वर्षें राहिले होते. ईश्वरभक्तीपर गीतें स्वतः ते करीत व म्हणून दाखवीत. ब्राह्मसमाजाचे ते फार मोठे आधारस्तंभ होते. हिंदी व युरोपीय तत्त्वज्ञान यांच्या यथार्थ स्वरूपावर त्यांचीं व्याख्यानें होत. एकदां व्यापारांत तोटा आला व लोकांचें नुकसान झालें. पण देवेंद्रनाथांनीं जबाबदारी टाळली नाहीं. त्यांनीं लागलीच घरांतील अमोलिक जिन्नस विकले व लोकांचें सर्व देणें देऊन टाकलें. अशा या थोर दानतीच्या 'शुद्ध बीजापोटीं' रवींद्रांचें रसाळ गोमटें फळ लाभलें तर त्यांत आश्चर्य तें काय ?

रवींद्रांचा जन्म दि. ६ मे १८६१ या दिवशीं झाला. रवींद्र हे सगळ्या भावंडांत धाकटे. त्यांना मातृसुख फार काळ लाभलें नाहीं. परंतु वडील भावजयीनें त्यांना ती उणीव भासूं दिली नाहीं. टागोरांच्या घराण्याचा पसारा मोठा. वीस पंचवीस माणसें तरी घरांत होतींच. पण घरांत सदैव आनंदाचें व शांतीचें साम्राज्य नांदत असे !

स्त्रियांचीसुद्धां धुसफूस व भांडणें नसत हें तर केवढें आश्चर्य ! उलट ठाकूर घराण्यातर्फे चालणाऱ्या 'भारती' मासिकांत लिहिण्याच्या व प्रसंगीं त्या मासिकाचें संपादकत्व स्वीकारण्याच्या योग्यतेच्या स्त्रिया त्या घरांत

नांदत होत्या. देवेंद्रनाथ हे विरक्त होऊन आपला सर्व वेळ ईश्वरचिंतनांत व बोलपूर, हिमालय वगैरे ठिकाणीं एकान्तांत घालवीत असत. असें असूनहि त्यांचें घराकडे व मुलांबाळांकडे संपूर्ण लक्ष असे. घरीं असल्यावर ते रवींद्राला व त्याच्या भावंडांना व्यवहारज्ञान शिकवीत. आल्या गेल्या गुणी माणसांना साहाय्य देऊन त्यांनीं ठाकूर घराण्याचा दानशूरपणाचा लौकिक वाढवीतच ठेवला. देवेंद्रनाथ हे स्वभावानें कठोर नसतांनाहि घरांतील सर्वांनाच त्यांचा विशेष दरारा वाटे !

**नावडते नोकर नि शाळा**

श्रीमंतांच्या मुलांनीं बाहेर जाऊं नये, गरीब मुलांशीं बोलूं नये, त्यांच्यांत मिसळूं नये; तर चाकरनोकरांच्या अंगाखांद्यावर बागडावें, बाहेर फिरावें या श्रीमंती पद्धतीची रवींद्रांना मोठी पीडाच वाटावयाची. लहानपणीं नोकरांच्या ताब्यांत राहावें लागल्यामुळें नैसर्गिक स्वातंत्र्यावर दडपण येई व त्यांची मोठी कुचंबणा होई. मोठ्यानें बोलावयाचें नाहीं. घराबाहेर पाऊल टाकावयाचें नाहीं. अशा तऱ्हेच्या नोकरांच्या करड्या नजरेमुळें आपण नोकरांच्या या गुलामगिरींतून केव्हां सुटूं असें बाल रवींद्राला झालें होतें. रवींद्र म्हणतात, "एखादा बंदिवान एखाद्या खोलींत रखवालदाराच्या ताब्यांत दिलेला असावा तशी माझी स्थिति होती. मी नेहमीं आपल्या खोलींत बसून असें. माझे सोबती म्हणजे नोकर. माझी करमणूक काय तर खिडकींतून बाहेरच्या जगांत काय चाललें असेल त्याचीं

कल्पनाचित्रें मनश्चक्षूपुढें उभीं करावयाचीं !....मला सृष्टिनिरीक्षणाचा फार नाद असे....सृष्टि ही आपली अत्यंत जिवलग मैत्रीण अशी माझी भावना. तिच्या ठिकाणीं मला प्रतिक्षणीं नवें नवें सौंदर्य दिसत असे."

वयाच्या सातव्या वर्षीं रवींद्र शाळेंत जाऊं लागला. पण त्याचें मन शाळेंत कधींच रमलें नाहीं. शाळा म्हणजे तुरुंग व लहान मुलें म्हणजे गुराख्यानें वळावयाचीं गुरें असा त्याचा रास्त समज झाला ! शाळेंत वावरणारे गुरुजी हे त्याला कर्दनकाळ वाटत व शाळेंत होणाऱ्या क्रूर शिक्षा पाहून तर घरच्या नोकरांच्या तावडींतून सुटून आपण मूर्तिमंत गुलामगिरींत पडलों असें त्याला वाटे ! त्याकाळीं शाळांतून जबर शिक्षा करीत. अल्पशा चुकीसाठींहि कडक शासन होई. धडे न करणाऱ्यांना आंगठे धरावयास लावून मग त्यांच्या पाठीवर पुस्तकें रचून ठेवीत. रचलेल्या पुस्तकांतील एखादें पुस्तक ढासळलें तर त्या मुलाला छडीनें बेदम मारीत ! हा प्रकार पाहिल्यावर रवींद्रानें शाळा बुडविण्यास आरंभ केला. शाळा बुडावी, त्यासाठीं आपल्याला ताप यावा म्हणून बूट भिजवून तो पायांत घाली ! रविबाबूचा व शाळेचा संबंध हा असा विळ्या-भोपळ्यासारखा होता !

घरीं मुलांत खेळतांना रविबाबू शिक्षक होई व पडवींतल्या गजांना शाळेंतील मुलें समजून तो आपली छडी त्या निर्जीव मुलांच्या अंगावर फोडी ! या प्रसंगावरून शाळा व शिक्षक यांच्याबद्दलची त्याची कल्पना ध्यानांत

येण्यासारखी आहे. अशा तऱ्हेनें शाळा व शिक्षक यांच्या-बद्दलचा त्याचा तिरस्कार, अभ्यासाविषयींची अनास्था, शाळा बुडवून सृष्टिसौंदर्य अवलोकण्याची त्याची संवय व त्याचा हट्टी स्वभाव यामुळें घरच्या मंडळींना काळजी वाटे, निराशा वाटे !

पण रविबाबू निराशा वाटावी असा विद्यार्थी नव्हता. एकदां काय झालें कीं, एका परीक्षकानें रवींद्राच्या सर्व वर्गाची बंगालीची परीक्षा घेतली व त्या परीक्षेंत त्याला सर्वांपेक्षां अधिक गुण मिळाले. शिक्षकांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, "हा मागच्या बाकावर बसणारा, एकाहि प्रश्नाचें उत्तर न देणारा मठ्ठ विद्यार्थी. याला कसचे जास्त गुण मिळणार ? त्यांनीं तक्रार केली. पुनः परीक्षा घेतली गेली. पुनः रवींद्रालाच जास्त गुण मिळाले. शिक्षक थिजले !

शाळेंत असतांनाच रवींद्र शाळेच्या गच्चीवर तासचे तास सृष्टिशोभा पहात बसे व तोंडानें गुणगुणे. घरीं, बागेंत इकडे तिकडे फिरून तासचे तास तो घालवी. शाळेंत वाचलेल्या कवितांचें अनुकरण करून एक-एक कविता आतां निर्माण होऊं लागली. अभ्यास रेंगाळला. पण घरचे कोणीहि त्याला टाकून बोलत नसत. उलट त्याच्या आवडत्या काव्यरचनेस चालना देत, उत्तेजन देत. रवींद्रानें दहाव्या वर्षापासूनच काव्यरचनेस सुरवात केली. त्याला बंगाली काव्य-वाचनाची संवय लागली. त्याची पाठांतरशक्तिहि उत्तम होती. एका निळ्या पाना-

च्या चोपडींत लहान लहान अनुकरणात्मक कविता तो लिहूं लागला. वडील बंधूंचें त्याला उत्तेजन मिळे. एकदां एक संपादक घरीं आले होते. वडील बंधु द्विजेंद्रनाथ यांनीं रवींद्राची व संपादकांची ओळख करून दिली. रवींद्र कविता करतो हें ऐकल्यावर संपादकांनीं कांहीं कविता म्हणावयास सांगितल्या. सांगतां क्षणींच रवींद्रानें कविता सुंदर रीतीनें म्हटल्या व संपादकांची शाबासकी मिळविली. रवींद्राला आतां सगळे 'नव बालकवि' म्हणून संबोधूं लागले.

महर्षि देवेंद्रनाथ हे स्वतः थोर प्रासादिक कवि म्हणून प्रसिद्ध होते. रवींद्राचीं पदें ते आनंदानें व अगत्यानें ऐकत व खूष होऊन त्याला शाबासकी देत. एकदां एका घरगुती उत्सवांत महर्षींनीं रवींद्राला स्वतः पदें रचून तीं गाऊन दाखविण्यास सांगितलें. रवींद्रानें ती कामगिरी फार उत्तम तऱ्हेनें पार पाडली व सुरेख रीतीनें आपलीं पदें खड्या आवाजांत म्हणून दाखविलीं. महर्षींनीं त्याच्या प्रतिभेची स्तुति केली व "हा मुलगा घराण्याची कीर्ति दिगंतरीं पसरवील" अशी थोर आशा त्यांनीं व्यक्त केली.

रवींद्रानें दोन वर्षांतच शाळेला रामराम ठोकला! नंतर घरच्या घरींच त्याच्या शिक्षणाची सोय करण्यांत आली. गणित, भाषा, भूगोल, शास्त्र व विविध कला त्याला शिकविल्या जात. वडिलांच्याबरोबर हिमालयाच्या परिसरांत रवींद्र खूप हिंडला. स्वतःची जमीनदारी असलेल्या ठिकाणीं निसर्गाशीं त्यानें यथेच्छ हितगुज केलें. पंधराव्या वर्षींच त्याच्या कविता छापून येऊं लागल्या. 'ज्ञानांकुर'

व 'साधना' या नियतकालिकांत त्याचें गद्य व पद्य साहित्य प्रसिद्ध होऊं लागलें. सतराव्या वर्षापर्यंत सात हजार ओळींपावेतों त्याचें वाङ्मय प्रसिद्ध झालें होतें.

### विलायतेंतील शिक्षण

असें जरी असलें तरी रवींद्रानें विलायतेस जावें व बॅरिस्टर किंवा आपल्या वडील बंधूप्रमाणें आय्. सी. एस्. व्हावें असें महर्षींना व रवींद्राच्या वडील बंधूंना वाटे. समुद्रोल्लंघन निषिद्ध मानण्याचा तो काल असूनहि रवींद्र मोठ्या निर्भयपणें इंग्लंडला गेले. नव्या सृष्टींत वावरावयास मिळालें म्हणून त्यांचें कविमन प्रफुल्लित झालें. काव्यानंदाची व विशाल साहित्याची गोडी लागलेल्या मनाला वकिलीचा खऱ्याचें खोटें व खोट्याचें खरें करण्याचा व्यवसाय मानवणारा नव्हता, जमणारा नव्हता ! हें वेळींच ओळखून रवींद्रांनीं वकिलीच्या अभ्यासाचीं पुस्तकें बाजूला सारलीं. त्यांच्यावर धूळ सांचली; कारण त्यांत त्यांचें मनच रमेना !

इंग्लंडमध्यें रवींद्रांचें कविमन रमलें तें इंग्रजी ललित वाङ्मयाच्या अभ्यासांत व संगीताच्या सशास्त्र अभ्यासांत. आरंभीं कांहीं काळ लॅटिन भाषेचा अभ्यास केल्यावर त्यांनीं साहित्य व संगीत यांची अखंड सेवा चालूं ठेविली. शेक्सपिअर, कीट्स, शेली, वर्डस्वर्थ व बायरन या कवींच्या काव्यसागरांत मनसोक्त डुंबावें व सुंदर सुंदर सौंदर्यस्थळें पाहण्यांत गुंग व्हावें असा त्यांचा कार्यक्रम ठरून गेला. तेथें त्यांच्या भावनांचा व विचारांचा अभिनव

विकास होत होता. परीक्षेचा विचार मात्र कोठच्या कोठें मागें पडला होता. शेवटीं संगीत व काव्य या दोन कलांचे महान उपासक बनून ते भारतांत परत आले.

तिकडून परत येतांना रवींद्रांनीं 'संध्या-संगीता'स सुरवात केली. सदर काव्यांत बंगाली वृत्तांचे सर्व ठराविक नियम झुगारून देऊन कवीची प्रतिभा स्वैरसंचार करूं लागली. 'संध्या-संगीता' नंतर 'प्रभात-संगीत' निर्माण झालें. या दोन्ही काव्यांनीं बंगाली वृत्तरचनेंत एकदम क्रांति घडवून आणली व रवींद्रांचें कवित्व बंगाली वाङ्मयांत श्रेष्ठ प्रतीचें ठरविलें.

बंगालमध्यें सबंध ठाकूर घराणें अजरामर झालें आहे. या घराण्यानें कवि, तत्त्वज्ञानी, शास्त्रज्ञ, संगीतज्ञ व चित्रकार देशाला पुरविले व आपल्या अपूर्व वाङ्मयसेवेनें स्वतःला धन्य केलें ! घराण्याचा जागृत स्वदेशाभिमान व स्वभाषेबद्दलची अलोट प्रेमबुद्धि या दोन गुणांमुळें घराण्यांतील सुशिक्षित स्त्री-पुरुषांनीं 'भारती' नांवाचें मासिक चालविलें. रवींद्रनाथ पंधरा सोळा वर्षांचे होते तेव्हांपासूनचे त्यांचे लेख व कविता या मासिकांत येत. संपादक-वर्गांतील त्यांच्या वडील बंधूंबरोबर बालकवि रवींद्रनाथ यांचेंहि नांव मासिकाच्या मुखपृष्ठावर झळकत होतें. याच सुमारास रवींद्रांचीं 'वनफूल', 'कविकथा' व 'गाथा' इत्यादि लघुकाव्यें व 'करुणा' आणि 'भग्नहृदया' या कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या. 'वाल्मिकी-प्रतिभा' ही नाटिका तर त्यांनीं चौदाव्या वर्षींच लिहिली होती.

विलायतेहून परत आल्यावर कलकत्त्यास रवींद्रनाथ हे एक मोठे कवि म्हणून मानले जाऊं लागले. सरस्वती व लक्ष्मी यांचा वरदहस्त त्यांच्यावर होताच. याच वेळेस त्यांचा विवाहहि झाला. रवींद्रनाथ दिसावयास अतीव सुंदर होते. भव्य व उंच शरीरयष्टी, सुंदर व सरळ नाक आणि कमलाप्रमाणें विशाल डोळे यामुळें ते सगळ्यांचेंच मन आकर्षून घेत.

सुंदर देह, लाभलेली कीर्ति, सुंदर वधू व गजान्त लक्ष्मी या सर्व गोष्टींमुळें रवींद्र केवळ सुखसागरांतच डुंबत होते. साहजिकच या कालांतील त्यांचें काव्य विलासी, नाविन्यपूर्ण कल्पनांनीं बहरलेलें व स्त्रीप्रेमविषयक होतें. त्यांचें काव्य वाचून तरुण वेडे झाले. आतां कलकत्त्यास रवींद्र सर्वत्र दिसूं लागले. कोठल्याहि महत्त्वाच्या प्रसंगीं रवींद्र नाहींत असें कधींहि होत नसे. रवींद्र हे उत्कृष्ट गायकहि होते. बंकीमबाबूंचें 'वंदे मातरम्' हें गीत एका सभेंत रवींद्रांनींच प्रथम गाऊन दाखविलें. सभा बेहोष झाली. संगीत व काव्य यांच्या अलौकिक देणगीनें संपन्न असलेल्या रवींद्रांचें तरुण लोक विविध तऱ्हेनें अनुकरण करूं लागले. कांहीं काळानें त्यांना एक सुंदर पुत्ररत्न लाभलें. आनंदरसाला तूट नव्हती.

या अवधींत लहान लहान नाटकें व उत्कृष्ट कादंबऱ्या त्यांनीं लिहिल्या. काव्यरचनाहि केली. पण ती अर्थातच प्रेमविषयक होती.

वयोमानानें व कालमानानें कवींच्या काव्याचे विषय

बदलतात. रवींद्रांचेंहि तसेंच झालें. स्त्रीप्रेमाचा विषय मागें पडून त्याची जागा देशप्रेमानें घेतली. पुढें कालांतरानें हे दोनहि बाजूला पडले नि रवींद्र ईशभक्तीपर गीतें गाण्यांत रमून गेले. या उत्क्रांतीचा इतिहासच आपण आतां क्रमशः पाहूं या.

**देशभक्त टागोर**

१९०३ च्या पुढें बंगालमध्यें वंगभंगाच्या चळवळीचा डोंबच्या डोंब उसळला ! अर्थात् त्याच्या ज्वाळा देशभर पसरल्या. राष्ट्रसभेनें स्वराज्य, स्वदेशी, राष्ट्रीय शिक्षण व बहिष्कार या चतुःसूत्रीची घोषणा केली. बंगालभर देशभक्तीचा संचार झाला. राष्ट्रांतील या चैतन्याचा रवींद्रांच्या कविमनावर विलक्षण परिणाम झाला. देशभक्तीनें ते वेडे झाले ! त्यांची प्रतिभा अपूर्व अशीं देशभक्तीपर गाणीं प्रसवूं लागली. बंगालभर त्यांचीं गीतें गाइलीं जाऊं लागलीं. तरुणांचीं मनें देशप्रेमानें उचंबळून गेलीं !

'जनगण-मन-अधिनायक जये हे, भारत-भाग्य-विधाता' हें रवींद्रांचें राष्ट्रीय पद आज तर राष्ट्रगीताची पदवी पावलेलें आहे. त्यांची राष्ट्रभक्ति किती प्रखर होती तें पाहा. एका प्रसिद्ध गीतांत ते म्हणतात, "हे माझ्या प्रिय मातृभूमि, मी आपला देह तुला आज समर्पण करीत आहें. तुझ्याकरितांच हें आपलें आयुष्य मी वाहिलें आहे. तुझ्या दुःखाकडे पाहून आतां हे माझे डोळे अश्रू ढाळतील. आणि केवळ तुझ्या स्तुतींतच माझी ही प्रतिभा रंगून तुझ्या गुणांचें गायन करीत राहील."

पण महर्षि देवेंद्रांचे रवींद्र हे चिरंजीव होते. वैदिक वाङ्मयाच्या अभ्यासांत रमणाऱ्या व हिंदी आणि पाश्चात्य तत्त्वज्ञानांच्या चिंतनांत गढलेल्या महर्षींच्या सहवासामुळें विश्वव्यापी तत्त्वज्ञानाची गोडी रवींद्रांनाहि वाटूं लागली. पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतींचा मिलाफ झाल्यासच खऱ्या संस्कृतीचा उदय होणार आहे अशी त्यांची श्रद्धा होती. दोन्ही संस्कृतींतील चांगल्या गोष्टी एकत्र झाल्या तरच जगाचा उद्धार होईल अशी त्यांची ठाम समजूत होती. त्यामुळें त्यांना एकाच देशासंबंधीं निष्ठा उत्पन्न करणारी व इंग्रजांचा तिटकारा नि द्वेष शिकविणारी देशभक्ति संकुचित वाटूं लागली ! ते प्रत्यक्ष चळवळींतून दूर झाले. त्यासाठीं खूप निंदाहि त्यांना सहन करावी लागली. पण त्यांची जातच थोर पुरुषांची असल्यामुळें निंदा-स्तुतीच्या पलीकडे ते केव्हांच गेले होते. 'अवघें विश्वचि माझें घर' ही त्यांची व्यापक बुद्धि आतां अचल झाली होती. याचा अर्थ इंग्रजांनीं केलेल्या अत्याचारांकडे ते दुर्लक्ष करीत असा बिलकुल नाहीं. जेव्हां जालियनवाला बागेंतील हत्याकांड झालें तेव्हां त्यांनीं सरकारकडे कडक निषेधाचें पत्र पाठविलें व सरकारनें दिलेली 'सर' ही बहुमानाची पदवी परत केली.

### 'गीतांजली' चे निर्माते कविसम्राट

रवींद्रनाथ हे आतां देशभक्तीच्याहि पलिकडे असलेल्या देवभक्तीकडे म्हणजेच विश्वप्रेमाकडे वळले होते. जे प्रसंग मनुष्यास ईश्वराकडे नेतात ते दुर्दैवी प्रसंगहि त्यांच्यावर

लागोपाठ आले. त्यांची प्रिय पत्नी मरण पावली. कुटुंबांतील इतरहि प्रिय व्यक्ती याच वेळेस इहलोक सोडून गेल्या. प्रिय पुत्राचाहि वियोग नशिबीं आला ! रवींद्र विरक्त बनले. तशाहि स्थितींत ज्या परमेश्वरानें त्यांच्या मनाला धीर दिला त्या परमेश्वराकडे ते भक्तीनें व प्रेमळ अंतःकरणानें वळले व त्याला अनेक सुंदर गीतांनीं त्यांनीं आळविलें. 'नैवेद्य' 'खेया' वगैरे कविता याच वेळच्या. याच निरनिराळ्या भक्तिमय गीतांना एकत्र करून पुढें जगप्रसिद्ध 'गीतांजली' झाली. या सर्व गीतांत भगवंत हाच एक विषय आहे. नादमधुर शब्द, सुंदर कविकल्पना, उत्कट भावना व भक्तीचा जिवंत झरा यामुळें हीं गीतें अतिशय रम्य नि मनोहर झालीं आहेत. याच 'गीतांजली' नें जागतिक कीर्तीचें 'नोबेल' पारितोषिक रवींद्रनाथांना मिळवून देऊन भारताचें नांव जगांत सर्वतोमुखीं केलें.

पाश्चात्य पंडितांनाहि गुंगवून सोडणारा अलौकिक परिमळ ज्या गीतकुसुमांतून निर्माण झाला तीं गीतकुसुमें १०३ आहेत. त्यांचीच अंजली रवींद्रांनीं परमेश्वरचरणीं वाहिली. हीच ती 'गीतांजली'. 'गीतांजली' चा मुख्य विषय अध्यात्म आहे. रवींद्र हे जसे महाकवि आहेत तसेच ते जगाला मार्गदर्शन करणारे एक श्रेष्ठ तत्त्वज्ञ आहेत. उपनिषदें, रामायण, महाभारत, कबीर व नानक या सर्वांच्या पासून त्यांना स्फूर्ति मिळाली आहे. त्यांचीं काव्यें वाचतांना नाविन्य, जिवंतपणा, सुरसपणा व नादमाधुर्य

दृष्टीस पडतें. तसेंच त्यांत द्वैत–अद्वैत, आणि ज्ञान–भक्ति–कर्म यांचा उत्कृष्ट समन्वयहि पाहावयास सांपडतो. रवींद्रांनीं आपल्या काव्यांत व्यवहार व परमार्थ यांची मुळींच फारकत होऊं दिली नाहीं. जो वेदान्त बुद्धीला पटून अंतःकरणांत बिंबून कृतीमध्यें उतरला नाहीं तो खरा वेदान्तच नाहीं अशी त्यांची कल्पना होती. त्याग ज्ञानमूलक व वैराग्य विवेकयुक्त असलें पाहिजे. आणि त्यांचें पर्यवसान सर्वांभूतीं प्रेम व अखिल मानवजातीची सेवा यांत झालें पाहिजे, अशी त्यांची योग्य शिकवण होती. त्यांनीं व्यावहारिक विषयाला आध्यात्मिक अस्तर लावून वाचकांना अध्यात्माची गोडी लाविली–त्यांना ईश्वर-भक्तीकडे नेलें.

जडवादानें निरीश्वर बनलेल्या पाश्चिमात्यांना रवींद्रांची स्फूर्तिदायक वाणी दैवी स्वरूपाची भासली. असमाधानाच्या मृगजळामागें धांवणाऱ्या पाश्चात्यांना गीतांजलींतील समाधान आणि शांति यांच्या मधुर संदेशानें वेडे केलें. बसल्या जागीं समाधान व तृप्ति देणारा भक्तिमार्ग रणकुंडांत होरपळणाऱ्यांना ईश्वरी देणगी वाटला! रवींद्रांचा सर्व जगांत नवा संदेश देणारा प्रेषित म्हणून गौरव झाला. जगांतील सर्व विश्वविद्यालयांतून त्यांना निमंत्रणें आलीं. जगांतील सर्व भाषांमधून गीतांजलीचीं भाषांतरें झालीं आणि जगांत कोणत्याहि ग्रंथाला लाभला नाहीं इतका प्रचंड स्वपाचा मान रवींद्रांच्या गीतांजलीला लाभला!

अशा या गीतांजलींत पहिल्या गीतापासून तों शेवटच्या गीतापर्यंत कवि परमेश्वरास नाना प्रकारें आळवून त्याचा शोध करीत आहे. कवि म्हणतो, "परमेश्वरा, तूंच माझा पिता, तूंच माझा जिवलग मित्र. मी तुझें कसें भजन पूजन करूं? तुझें दर्शन मला केव्हां होणार?.... तूंच आकाश आणि तूंच घरटें. तुझें प्रेम चोहोंकडे पसरलें आहे...तुझें स्वरूप दृश्य व अदृश्य असें आहे."...कवि पुढें म्हणतो, "परमेश्वरानेंच सर्व विश्वांत जीवनप्रवाह घालून चैतन्य आणलें......तोच जगदात्मा नाना प्रकारचीं रूपें, नाना प्रकारचीं नांवें धारण करून नाना प्रकारच्या हर्षखेदादि विकारांच्या लहरींनीं भक्ताच्या हृदयाला हलवून सोडतो." आनंदानें व प्रेमानें भरलेल्या जगाचा त्याग करून रानांतून ईश्वराचा शोध घेणाऱ्या मुमुक्षूचा कवीनें चांगलाच समाचार घेतला आहे. तो म्हणतो, "संन्यासांत मोक्ष नाहीं, जगाच्या आनंदमय बंधनांतच मला स्वातंत्र्यसुख लाभतें........ह्या संसार महोत्सवांत आनंद प्राप्त करून घेण्यासाठीं मला आमंत्रण मिळाल्यामुळें माझें जीवित आज धन्य झालें........परमेश्वराच्या पूजनासाठीं ध्यानधारणा नको; गंधफूल, धूपदीप वगैरे कांहीं एक नको......दीनदुबळ्यांच्या घरीं, कामकऱ्यांच्या रस्यावरील खडी फोडण्याच्या जागीं तो परमेश्वर वास करीत असतो."

शेवटीं गीतांजलींतील एक बंगाली गीत व त्याचें मराठी

रूपांतर देऊन गीतांजलीसंबंधींचें विवेचन संपवूं या. गीत परमेश्वराला समर्पण करतांना रवींद्र म्हणतात—

फुलेर मतन आपनि फुटाओ गान
हे आमार नाथ एइ तो तोमार दान
ओगो से फूल देखिया आनंदे आमि भासि
आमार बोलिया उपहार दिते आसि
तुमि निजे हाते तारे तुले लओ स्नेहे हासि
दयाकरे प्रभू राख मोर अभिमान

मराठी—देवा, पुष्पाप्रमाणें आपोआप प्रफुल्ल झालेलें हें गीत तुझीच देणगी आहे. हें फूल पाहून मला फार आनंद झाला आहे. आणि माझें म्हणून मी हें तुला समर्पण करीत आहें. तें तूं आपल्या हातांत घे नि प्रेमानें हांस. प्रभो, कृपा कर आणि माझा अभिमान राख.

## विविध साहित्यनिर्मिति

रवींद्रांचें काव्यक्षेत्र सर्वांगीण आणि अफाट आहे. त्यांत ईश्वर-भक्तिप्रधान, राष्ट्रीय भावनोद्दीपक, सृष्टिवर्णनपर व शिशुगीतें अशीं विविध तऱ्हेचीं काव्यें आहेत. त्यांची कथात्मक कविताहि बरीच आहे. त्यांत 'कच आणि देवयानी' ही कविताबद्ध कथा सर्वांत प्रसिद्ध आहे.

रवींद्रनाथांनीं ३८ नाटकें लिहिलीं आहेत. त्यांतील कांहीं विशेष प्रसिद्ध आहेत : नलिनी, चित्रा, डाकघर, राजा, विसर्जन, गृहप्रवेश, शारदोत्सव, मुक्तधारा, राजा व राणी आणि प्रायश्चित्त. आपल्या सर्व नाटकांमधून काव्यासच रवींद्रांनीं प्रामुख्यानें स्थान दिलेलें आढळतें. त्यांचीं

नाटकें अत्यंत उच्च दर्जाचीं आहेत. प्रेक्षकहि उच्च दर्जाचे व सुशिक्षित असावेत असा त्यांचा कटाक्ष होता. कित्येक शतकें अत्यंत हीन लोकांच्या हातीं राहिलेलें हें भारतीय नाट्यशास्त्र रवींद्रांनीं उच्च लोकांच्या हातीं आणून देण्याचा प्रयत्न केला. या दृष्टीनें त्यांचें महत्त्व बंगाली नाट्यवाङ्‌मयाच्या इतिहासांत कायमचें राहणार आहे.

शांतिनिकेतनमधील विद्यार्थ्यांसाठीं रवींद्रनाथांनीं अनेक एकांकी प्रहसनें लिहिलीं आहेत. मुख्य प्रहसनें म्हणजे 'व्यंगकौतुक', 'हास्यकौतुक', 'प्रहसन' व 'प्रजापतीर निबंध' हीं होत. अगदीं अल्पवयांत लिहिलेल्या 'वाल्मिकी-प्रतिभा' व 'कालमृगया' या त्यांच्या नाटिकाहि फार प्रसिद्ध आहेत.

बंगालमधील एक मोठे कादंबरीकार व सर्व जगांतील श्रेष्ठ लघुकथालेखक म्हणून रवींद्रनाथ नांवाजलेले होते. कवित्वाबरोबर कादंबरीलेखनाचें कौशल्यहि त्यांच्या ठिकाणीं उपजतच होतें. त्यांनीं 'भग्नहृदया' ही कादंबरी अठराव्या वर्षी लिहिली. त्यांच्या 'बाई ठाकूराणीर हाट', 'घरेबाईरे', 'गोरा', 'राजर्षि' व 'विचित्रवधूरहस्य' वगैरे कादंबऱ्या प्रसिद्ध आहेत. १९१६ मध्यें त्यांची 'होम अँड दी वर्ल्ड' ही इंग्रजी कादंबरी प्रसिद्ध झाली. या कादंबरीसारख्या इतर कादंबऱ्यांचीं भाषांतरें फ्रान्स सारख्या देशांत १००,००० प्रतींहून अधिक खपलीं असें म्हणतात.

रवींद्रनाथांचें लघुकथालेखन १८२१ पासून सुरू झालें. त्यांची पहिली लघुकथा 'बालकाचें आगमन' ( The Baby's Return ) ही होय. लघुकथांमधून दिसून येणारें त्यांचें रचनाकौशल्य अत्यंत श्रेष्ठ व अवर्णनीय असेंच आहे. त्यांच्या लघुकथा वाचतांना मनास आनंद होत असतो त्यांतील मनुष्यस्वभावाचीं वर्णनें अत्यंत सूक्ष्म व मार्मिक आहेत. व्हिक्टर ह्यूगोप्रमाणें रवींद्रनाथांचीहि जगभर उत्कृष्ट लघुकथालेखक म्हणून प्रसिद्धि आहे. रवींद्रांचीं शिशुवर्णनपर काव्यें जशीं प्रसिद्ध आहेत त्याचप्रमाणें बालकांचें शुद्ध, निर्मल व पवित्र अंतःकरण प्रतिबिंबित झालेल्या त्यांच्या लघुकथा याहि श्रेष्ठता पावलेल्या आहेत. 'काबुलीवाला' ही त्यांची कथा तर जगप्रसिद्ध आहे. रवींद्रनाथांच्या कथा-कादंबऱ्यांतून स्त्रियांच्याविषयीं एक प्रकारचा आदर व त्यांच्या मातृत्वाबद्दलची उच्च भावना दिसून येते. त्याचप्रमाणें त्यांच्या वाङ्मयांत पूर्व-पश्चिम एकीकरणाची कल्पनाहि सारखी आलेली आहे. त्यांच्या 'गोरा' या कादंबरींत 'गोरा' हा पोरका आयरिश मुलगा हिंदु कुटुंबांत स्वतःच्या मुलाप्रमाणें वाढविलेला दाखविला आहे. रवींद्रनाथांच्या लघुकथांनीं वाचकांचीं मनें भारून टाकलीं. त्यांचें लघुकथात्मक वाङ्मय अधिक उच्च दर्जाचें आहे. सर्वश्रेष्ठ लघुकथालेखक म्हणून जगांतील प्रसिद्ध लघुकथालेखकांच्या मालिकेंत रवींद्रांचें स्थान अढळ मानलें जातें.

रवींद्रनाथांनीं बंगाली वाङ्मयांत अत्यंत मोठी नि मोलाची भर घातलेली आहे. त्यांनीं ३००० कविता, ५० निबंध, ३८ नाटकें, ३५ राजकीय ग्रंथ व १९ कथासंग्रह इतकी प्रचंड वाङ्मयनिर्मिति केली आहे. त्यांची साहित्य-सेवा अनेकविध आहे. विविधतेंत प्रख्यात लेखक व्हिक्टर ह्यूगो याचें लेखनहि रवींद्रनाथांच्यापुढें फिकें पडतें, असें इंग्रजी लेखक थॉमसन हे म्हणतात. रवींद्रनाथ हे सध्यांच्या युगाचे प्रवर्तक ( Epoch-Maker ) आहेत असें जें मानलें जातें तें कसें यथार्थ आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

**आधुनिक काळांतील प्रेषित**

रवींद्रनाथ महाकवि होते, नाटककार होते, जगद्विख्यात लघुकथालेखक होते. त्याचप्रमाणें ते गायक, अभिनयपटु, शिक्षक, वक्ते, सौंदर्योपासक व अप्रतिम चित्रकारहि होते. पण या सर्वांपेक्षां ते आपल्या तत्त्वज्ञानामुळें आधुनिक काळांतील प्रेषित होते–जगाला शांततेचा, आशेचा, प्रेमाचा व समन्वयाचा संदेश देणारे विचारप्रवर्तक होते. ते नुसतेच बोलके तत्त्वज्ञानी नव्हते तर कृतिशील तत्त्वज्ञ होते. त्यांनीं कृतीनें, स्वकष्टानें अहोरात्र आपलें तत्त्वज्ञान जगापुढें मांडलें. यासाठीं त्यांनीं जगद्विख्यात 'शांति-निकेतन' व 'विश्वभारती' या संस्था स्थापिल्या, चाल-विल्या व जगाला देणगी म्हणून मागें ठेविल्या. गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांची ही कामगिरी श्रेष्ठ मानली जाते.

आधुनिक शिक्षणपद्धतींतील दोष, तिच्यांतील अनैसर्गिकपणा व तिच्यामुळें तरुण पिढीची होणारी कुचंबणा व होणारा ऱ्हास यांची रवींद्रांना अगदीं लहानपणापासून पूर्ण कल्पना होती. शाळांची जागा, त्यांच्या वेळा, त्यांच्यांतील क्रूर शिक्षक व त्यांची अनैसर्गिक शिक्षणपद्धति या सर्वांबद्दल रवींद्रनाथांच्या मनांत पूर्वीपासून अत्यंत अनादर व तिटकारा उत्पन्न झाला होता. तो तिटकारा नुसत्या शब्दांनींच त्यांनीं व्यक्त केला नाहीं; तर 'शांतिनिकेतन' सारखी एक नमुनेदार शिक्षणसंस्था सुरू करून व सर्व तऱ्हेच्या खस्ता खाऊन ती उत्कृष्टपणें चालवून त्यांनीं तो मनांतला तिटकारा व्यक्त केला. आपल्या शैक्षणिक ध्येयास अध्यात्माची जोड देऊन त्यांनीं 'शांतिनिकेतन' हा आश्रम १९०१ मध्यें स्थापन केला.

कलकत्त्यापासून १०० मैलांवर बोलपूरजवळ हा आश्रम आहे. त्याची शोभा जवळच्या एका बधाऱ्यावरून फारच मनोहर दिसते. आश्रमाभोंवतीं पुष्कळ झाडी आहे. आंबराईच्या गर्द झाडींत प्रार्थनामंदिर दृष्टीस पडतें. मंदिराच्या दुसऱ्या बाजूस प्रसिद्ध असा सप्तपर्णीचा वृक्ष आपल्या गगनचुंबित शाखा पसरवून उभा आहे. ज्या वृक्षाखालीं महर्षि देवेंद्रांना ईश्वरी साक्षात्कार झाला तो हाच सप्तपर्णीचा वृक्ष. महर्षींच्या ध्यानाची ही जागा पवित्र म्हणून मुद्दाम राखून ठेवली आहे.

एके दिवशीं रायपूरच्या वाटेनें प्रवास करीत असतांना

महर्षि याच सप्तपर्णीच्या वृक्षाखालीं विश्रांतीसाठीं बसले. भोंवतालचा एकान्त व रम्य सृष्टिसौंदर्य पाहून महर्षि आनंदित झाले व थोड्या वेळांतच त्यांची समाधि लागली. वास्तविक ही जागा म्हणजे चोरांच्या भेटीची व लूट वांटून घेण्याची; म्हणजे त्यांच्या दृष्टीनें अत्यंत गुप्ततेची. पण त्या ठिकाणीं हा परका माणूस पाहून आपलें गुपित आतां फुटणार असें तेथें अचानकपणें आलेल्या चोरांच्या नायकाला वाटलें. तो सुरा उपसून ध्यानस्थ बसलेल्या महर्षींच्या अंगावर धावलाच. पण जवळ गेल्यावर ती ध्यानस्थ व शांत मूर्ति पाहून त्याचे डोळे दिपले व त्यानें महर्षींना साष्टांग नमस्कार घातला ! त्या वेळेपासून तो चोरांचा नायक महर्षींचा शिष्य झाला. अशा तऱ्हेनें आपणास शांति देणाऱ्या व दुष्टाच्या अंतःकरणांत सत्प्रवृत्ति निर्माण करणाऱ्या या रमणीय स्थळास महर्षि देवेंद्रांनीं 'शांतिनिकेतन' हें यथार्थ नांव दिलें.

अशा या पवित्र स्थलीं, निसर्गाच्या सान्निध्यांत रवींद्रनाथांनीं फक्त दोन मुलांवरच शाळेला सुरवात केली. बराच काळपर्यंत ही शाळा बुडीत खर्चांत चालवावी लागली. रवींद्रनाथांची वाङ्मयसेवा जसजशी लोकांत प्रसिद्धि पावूं लागली तसतशी शाळेची कीर्ति सर्वत्र पसरूं लागली. योगी अरविंदांनीं आपल्या 'कर्मयोगी' मासिकांत रवींद्रांच्या या उच्च शिक्षणसेवेची खूपच तारीफ केली. त्यामुळें 'शांतिनिकेतना' ला मोठी प्रसिद्धि मिळाली.

आणि पुढें गीतांजलीबरोबर व नोबेल पारितोषिकाबरोबर या 'शांतिनिकेतना' चें नांवहि जगभर ऐकूं येऊं लागलें. भारतांत राष्ट्रीय शिक्षणाची चळवळ जेव्हां सुरू झाली तेव्हां या संस्थेकडे आदर्श संस्था म्हणून सगळयांचें लक्ष गेलें. आज या आश्रमांत पौर्वात्य व पाश्चिमात्य सुधारणेचें स्वरूप एकवटलेलें दिसतें. सर्व जगांत प्रसिद्ध असलेली अशी ती एक मोठी शैक्षणिक वसाहतच बनलेली आहे.

रवींद्रनाथांनीं या आपल्या आवडत्या संस्थेसाठीं पुष्कळच त्याग केला आहे. 'नोबेल' पारितोषिकाचे मिळालेले सव्वा लक्ष रुपये त्यांनीं या संस्थेला दिले. या संस्थेच्या मदतीसाठीं ते देशोदेशींहि पुष्कळ हिंडले. त्यांनीं आपल्या प्रिय काव्यप्रतिभेसहि या संस्थेसाठीं कांहीं काळ दूर ठेवलें. पण त्यांचे हे सर्व प्रयत्न केवळ 'शांतिनिकेतना'साठींच नव्हते; तर त्यांना यांतून पूर्व-पश्चिम संस्कृतीचा मिलाफ घडवून आणणारें जगप्रसिद्ध 'विश्वभारती' विद्यापीठ निर्माण करावयाचें होतें. तें स्वप्न त्यांनीं १९२१ मध्यें साकार केलें–प्रत्यक्षांत आणलें.

## 'विश्वभारती' विद्यापीठ

रवींद्रनाथ हे अभिनव तत्त्वज्ञानाचे पुरस्कर्ते होते. प्राचीन ऋषींची उज्ज्वल परंपरा आणि आधुनिक जगांतील नाविन्य यांचा मनोहर संगम त्यांच्या विचारांत–वाङ्मयांत आपल्याला पाहावयास सांपडतो. पौर्वात्य व पाश्चि-

मात्य संस्कृतींच्या संगमानें व मिलाफानेंच खऱ्या नवसंस्कृतीचा उदय होईल असा त्यांचा विश्वास होता. तेव्हां या विविध संस्कृति एकत्र आणाव्या, त्यांचें संशोधन व्हावें, मनन व्हावें व त्यायोगें धार्मिक, सामाजिक व राजकीय विषमता नष्ट व्हावी व मानव मानवाशीं प्रेमानें वागावा यासाठीं रवींद्रांनीं एक जागतिक केंद्र म्हणून 'विश्वभारती' ची स्थापना केली.

"पूर्व ती पूर्व आणि पश्चिम ती पश्चिम ! पूर्वपश्चिम कधींहि एक होणार नाहीं" अशी आरोळी किपलिंग या साम्राज्यवाद्यानें ठोकली. तेव्हां "पौर्वात्य व पाश्चिमात्य संस्कृतीचें जर एकीकरण झालें तरच मानवजातीचें खरें कल्याण होईल" असा गंभीर इषारा रवींद्रांनीं दिला. नुसता इषारा त्यांनीं दिला नाहीं तर कृतीला सुरवात केली व 'विश्वभारती'ची स्थापना केली. रवींद्रनाथांनीं इंग्लंड, फ्रान्स, इटाली, जर्मनी, ऑस्ट्रिया व अमेरिका या देशांत प्रवास केला. 'विश्वभारती'ची कल्पना तेथील विद्वानांपुढें मांडून त्यांचा पाठिंबा व शिक्षणकार्यांत प्रत्यक्ष मदत करण्याचीं आश्वासनें त्यांनीं मिळविलीं.

आपला हिंदुस्थान म्हणजे अध्यात्मविद्येचें उगमस्थान. सर्व धर्मांच्या लोकांना एका भारतांतच काय तो आश्रय मिळाला. अशा सर्वसंग्राहक भारतवर्षांत विश्वभारतीची स्थापना व्हावी हें योग्यच नव्हे काय ? स्वामी रामतीर्थ व स्वामी विवेकानंद यांच्या अपुऱ्या राहिलेल्या कार्याची

पूर्तता करण्यास रवींद्रनाथांनीं पुढें यावें हें केव्हांहि उचितच होय !

दि. २४ सप्टेंबर १९२२ रोजीं "विश्वभारतीची रुपरेषा" या विषयावर रवींद्रनाथांचें पुण्यास किर्लोस्कर नाटचमंदिरांत व्याख्यान झालें. त्यांतील पुढील उद्‌गार रवींद्रनाथांचे शिक्षणविषयक विचार समजण्याच्या दृष्टीनें मोठ्या मोलाचे आहेत. ते म्हणाले, "विद्यार्थ्यांचें मन आंतून पुष्ट व सतेज बनलें पाहिजे तरच ती खरी संस्कृति. ... सांखळीनें बांधून ठेवलेल्या पक्ष्याची सांखळीच प्रथम तोडली पाहिजे. ती असेपर्यंत 'देवानें पंख दिले आहेत ते आकाशांत उडण्यासाठीं' असें त्याला नुसतें सांगून काय उपयोग ? ....पांगळेपणा जावयाचा तर मेहनतीनें पाय सुदृढ केले पाहिजेत. परदेशी लांकडी पाय लावले तर ते आवाज मात्र खूप करतील ! .... आमच्याकडे ग्रंथ मात्र बोलतो, मनुष्यें मात्र विचार करीत नाहींत व बोलतहि नाहींत .... विश्वभारतींत स्वतः आजन्म विद्यार्थी असणारेच शिक्षक शिकवितील. गुरु व शिष्य एकत्र राहिले, नांदले, मनानें समरस झाले तरच खरें शिक्षण मिळेल. शिक्षकांत मनुष्यत्व असलें म्हणजे खरें शिक्षण मिळणार ! ....स्वभाषा ही छत्रीसारखी किंवा ओव्हर-कोटासारखी हवी तेव्हां घेतली, हवी तेव्हां ठेवली, अशी नाहीं; ती अंगाच्या कातडीसारखी आहे. परकी भाषेवर अवलंबून राहून खऱ्या विद्येची अपेक्षा करणारा मनुष्य हास्यास्पद होय !

"...पाश्चात्यांचें शास्त्रीय ज्ञान आपण घेतलेंच पाहिजे. पण पाहुणा आला आणि घरधनी होऊन बसला असें मात्र होऊं नये इतकेंच मी म्हणतों. परकीय संस्कृति घ्यावयाची, पण तिच्यावर आपणच स्वार झालें पाहिजे...जुन्या विद्येंत आतां काय उरलें आहे असें कोणी म्हणतात. पण ही त्यांची चूक आहे. परदेशांतील कचऱ्याच्या पेट्यांतील चिंध्या चिवडण्यापेक्षां आपल्या जुन्या वाड्यांतील तळघरेंच दिवा घेऊन शोधिलीं तर हाताला कांहींतरी अधिक सांपडेल... नित्य नैमित्तिक पाठ व प्रत्यक्ष सदाचार हेंच पूर्वीं धार्मिक शिक्षण असे.... वरील सर्व प्रकारचें ध्येय डोळ्यांपुढें ठेवून मी आपल्या नवीन शिक्षण-संस्थेची योजना बनविली आहे." अशा या विश्वभारती विद्यापीठांत सर्व जगांतून निरनिराळ्या देशांचे विद्यार्थी येतात. या पवित्र ठिकाणीं रवींद्रनाथांचें संस्कृति-ऐक्याचें स्वप्न साकार झालेलें दिसतें. जगाला हीच त्यांची सर्वश्रेष्ठ देणगी होय.

### चीन-जपानचा दौरा

रवींद्रनाथांच्या संस्कृति-ऐक्याच्या तत्त्वज्ञानाची आरंभीं आरंभीं पुष्कळच अवहेलना झाली. स्वदेशीं व परदेशीं त्यासाठीं त्यांना अपमानहि सोसावे लागले! पण स्वतत्त्वावर अचल श्रद्धा असल्यामुळें आजचे हांसणारे–कुचेष्टा करणारे उद्यां स्तुति करूं लागतील अशी त्यांची खात्री होती. आणि जपानमध्यें त्यांना नेमका हाच अनुभव आला.

१९१७ मध्यें ते जेव्हां प्रथम जपानमध्यें गेले होते तेव्हां त्यांनीं त्या राष्ट्राला पाश्चिमात्यांच्या घातकी राष्ट्रीय कल्पनांचा व्यर्थपणा पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण तो उपदेश त्या राष्ट्राला त्यावेळीं पटला नाहीं. जपानमधील तरुणांनीं रवींद्रांच्या व्याख्यानाची थट्टाच केली! कविवर्यांची अध्यात्माची शिकवण, त्यांचा मानवजातीच्या कल्याणाचा उपदेश व जगांतील सर्व राष्ट्रांच्या एकीकरणाची त्यांची बलवत्तर इच्छा या सर्व गोष्टी त्या तरुणांना केवळ कविकल्पनाच वाटल्या ! पण दुसऱ्या जपानी दौऱ्यांत म्हणजे १९२३ मध्यें मात्र रवींद्रनाथांना विरुद्ध अनुभव आला. यावेळीं त्यांच्या व्याख्यानांस पुष्कळच गर्दी होत असे. जपान-मधील विद्वानांनाहि आपलें तत्त्वज्ञान आतां पटलें आहे, असें रवींद्रांना यावेळीं दिसून आलें.

जपानमधून रवींद्रनाथ चीनला आले तेथेंहि त्यांचें फार भव्य स्वागत झालें. चाललेल्या जयघोषांत एक मैलाचा प्रवास करण्यास त्यांना दोन तास लागले ! तेथील सर्व वृत्तपत्रांनीं चरित्र देऊन व अग्रलेख लिहून कविसम्राटांचें स्वागत केलें. जनतेचा उत्साह अवर्णनीय होता. रवींद्रनाथांच्या इतका आदरसत्कार चिनी लोकांनीं कोणाचाहि केला नाहीं. जाहीर सभेंत त्यांचें ‘ विश्वभारती ’ वर पहिलें व्याख्यान झालें तेव्हां अनेक विद्वानांनीं वार्षिक देणग्या देण्याचीं अभिवचनें जागच्या जागीं दिलीं. हिंदुस्थानचे व या दोन्ही देशांचे स्नेहसंबंध पुनः दृढ झाले. आशियांतील राष्ट्रांची

एकी घडवून आणण्याच्या दृष्टीनें रवींद्रांची ही सफर सुवर्णाक्षरांनीं लिहून ठेवण्यासारखी झाली आहे.

**रवींद्रनाथ व गांधीजी**

गांधी आणि टागोर म्हणजेच हिंदुस्थान असें एके काळीं सर्व जग मानीत असे. दोघांनीं अखिल मानवजातीसाठीं सर्वस्व वेंचलें व स्वदेह चंदनाप्रमाणें झिजविले. दोघांनीं सर्व जगांत विश्वबंधुत्व, समता व ऐक्य या ध्येयाचाच प्रसार केला. याशिवाय 'जनीं जनार्दन' पाहण्याची दोघांचीहि रीत सारखीच. दीनदुबळ्यांचें दुःख व यातना पाहून दोघेहि व्याकुळ होत. त्यांना सुख द्यावें, त्यांच्यावरील अन्यायाला वाचा फोडावी यासाठीं दोघेहि आयुष्यभर कष्टले, श्रमले. रवींद्रनाथांनीं तर स्पष्टच म्हटलें आहे कीं, "जेथें गरीब कष्टाळू मजूर कपाळाचा घाम पुशीत पुशीत काम करीत आहे, जेथें अन्नावांचून तळमळणारे आत्मे आपलें कष्टतर जीवित कसेंतरी कंठितात, अशा ठिकाणींच देवा ! तूं वास करीत असतोस." कष्टकरी लोकांत 'जनार्दन' पाहण्याची ही केवढी भव्य व उदात्त भावना ! आपल्या तत्त्वाच्या शिकवणीसाठीं दोघांनींहि आश्रम काढले व दोघांनींहि राष्ट्रीय शिक्षणसंस्था चालविल्या. दोघांनाहि एकमेकांबद्दल अत्यंत जिव्हाळा. येरवडा-कराराच्या प्रसंगीं महात्माजींचा जीव धोक्यांत आहे असें दिसल्याबरोबर वृद्ध गुरुदेव कलकत्त्याहून धांवून आले व त्यांच्याच व त्यांनींच म्हटलेल्या प्रार्थनेनें गांधीजींचा उपवास सुटला !

पण असें असूनहि दोघांच्या विविध मतांमध्यें भेदहि होताच. महात्माजी म्हणत, “ तप, संयम, इंद्रियदमन हेंच खरें जीवन.” तर गुरुदेव म्हणत, “आपलें जीवन प्रसन्न व प्रफुल्लित असावें आणि आत्मा स्वतंत्र असावा.” गांधीजींना तपस्व्यासारखें कष्टमय व साधें जीवन श्रेष्ठ वाटतें; तर रवींद्रांना मनुष्यसमाजाचें ऐहिक जीवन-सौंदर्य अधिक श्रेष्ठ वाटतें. गांधीजींचा भारतीय संस्कृती-वर जास्त जोर तर रवींद्रनाथांचा संस्कृतीच्या एकी-करणावर जास्त भर. ‘स्वराज्यसंपादनाचा एकच उपाय म्हणजे सूत काढणें’ या मंत्राला रवींद्रनाथांचा सक्त विरोध होता. ‘राष्ट्रोन्नति सर्वांनीं सर्व बाजूंनीं पार पाडली पाहिजे. येथें आग्रह कामाचा नाहीं.’ असा त्यांचा दृष्टिकोन होता. महात्माजींच्यासंबंधीं अत्यंत पूज्यभाव व प्रीति असूनहि त्यांनीं त्यांची बौद्धिक गुलामगिरी कधींहि पत्करली नाहीं, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

### गुरुदेवांचा संदेश

गुरुदेवांची मूर्ति केवळ ऋषितुल्य होती. सतेज कांति, कमलनेत्रांतील तपस्वी तेज, लांब केश, विशाल पांढरी शुभ्र दाढी, लांब रेशमी कफनी व पायांतील चंदनी खडावा, हा त्यांचा बाह्य थाट पाहतांक्षणींच कोणीहि नम्रच व्हावें. शांतिनिकेतनांतील आपल्या ‘उत्तरायण’ निवासस्थानांतून बाहेर येऊन हा अर्वाचीन काळचा प्रेषित जणुं कांहीं पुढील संदेश आपणां भारतीयांना देत आहे.

ते म्हणतात, "आपण आपली स्वत:ची उन्नति करून घेण्यास अपात्र आहोंत असा विचार क्षणमात्र मनांत आणूं नका. आपण आपली स्वत:ची उन्नति करून घेण्याचा काळ आतां आला आहे, हें ध्यानांत ठेवा. हिंदुस्थाननें सर्वांस एकसूत्रानें बद्ध करून ठेवण्याची आपली शक्ति कशी कायम ठेविली आहे हें ध्यानांत ठेवा. अनेक आपत्ती आल्या पण हिंदुस्थान इतर देशांप्रमाणें नामशेष झालेला नाहीं. अशा सामर्थ्याचा जो आमचा देश त्याच्यावर माझा विश्वास आहे. आणि आजहि तें सामर्थ्य, ती शक्ति नष्ट झालेली नाहीं. नव्या-जुन्याचा समेट करून त्याच्या द्वारें संघटित हिंदुस्थान तयार करण्याचें कार्य हळू हळू होत आहे. हिंदमातेच्या प्रत्येक बालकास ह्या कामीं साहाय्यक होतां येईल व तसें त्यानें व्हावें व कोणीहि ह्या कार्यीं विरोधक होऊं नये अशी माझी मोठी इच्छा आहे व देवापाशीं प्रार्थना आहे."

गुरुदेव रवींद्रनाथ टागोरांच्या या प्रार्थनेंत आपण सर्व नम्रतापूर्वक सहभागी होऊं या.

गुरुदेव रवींद्रांचा पवित्र देह १९४१ मध्यें ईश्वरचरणीं विलीन झाला ! लहान ज्योत मोठ्या ज्योतीशीं एकरूप झाली !!

* * *

BVBK-0401240
BVBK-0401240
शाखा.
9270 दि. 20/5/79
बा.वा.

# कांहीं तरी नवेंच करा

जीवनाची ठराविक चाकोरी सोडून—'कांहीं तरी नवेंच' करण्याची ईर्षा बाळगली आणि तत्सिद्ध्यर्थ विशिष्ट जीवनक्षेत्रांत अलौकिक कर्तृत्व केलें अशांची चरित्रें.

तीस मिनिटांत वाचून होणारीं पुस्तकें : शालेय-वर्गग्रंथालयासाठीं योजना

१. असा असतो देशभक्त : कोतवाल
२. गुलाम बंड करतो : स्पार्टकस
३. रा. शिक्षणाचा ध्यास : विजापूरकर
४. कादंबरीकार हरीभाऊ : आपटे
५. मराठी नटसम्राट : गण. जोशी
६. व्यायाम भीष्माचार्य : माणिकराव
७. लष्करी संघटक : क. लॉरेन्स
८. अलौकिक शिल्पकार : एंजलो
९. चित्रपट महर्षि : दादासाहेब फाळके
१०. इतिहासाचार्य राजवाडे : राजवाडे
११. बंदीजनांची माउली : फ्राय
१२. देशासाठीं दर्यापार : जेम्स कुक
१३. वीरबाला झोया : ( रशिया )
१४. बहादूर शिकारी : जिम कॉर्बेट
१५. कोई बी चीज उठाव : वुलवर्थ
१६. वीरपत्नी राणी दुर्गावती :
१७. विख्यात वकील : बॅ. जयकर
१८. विलक्षण वार्ताहर : अर्नेस्ट पाइल
१९. भारतीय चित्रकार : रविवर्मा
२०. मराठी मुद्रण-प्राणदाता : जावजी
२१. राजमाता जीजाबाई
२२. स्वदेशी कारखानदार : अंताजी काळे
२३. भव्य स्थापत्य : फर्डिनांड द लेसेप्स
२४. सर्कसबहाद्दर : विष्णुपंत छत्रे
२५. भक्तिवेडी बहिणा : बहिणाबाई
२६. सद्‌गुणी बनण्याची कला : फ्रॅंकलिन
२७. भारत-कवि टागोर : रवींद्रनाथ
२८. कोशकार केतकर : डॉ. केतकर
२९. कृषिपंडित : दादासाहेब शेंबेकर
३०. खरा खेळाडू : पी. बाळू
३१. चिरंजीव मरण : मदनलाल धिंग्रा
३२. विमामहर्षि : अण्णासाहेब चिरमुले
३३. तेजस्वी धर्मोद्धारक : शंकराचार्य
३४. बंडखोर लोककवि : अनंत फंदी
३५. साकार संगीत : पं. पलुस्करबुवा
३६. साहसी वैमानिक : सँटा ड्युमों
३७. दरियाचा राजा : कान्होजी आंग्रे
३८. जमिनीचा जादूगार : डॉ. कार्व्हर
३९. लाखांचा प्राणदाता : लुई पाश्चर
४० शिक्षण-भगीरथ : भाऊराव पाटील
४१. मराठी-मुद्रक : गणपत कृष्णाजी
४२. बर्फातला माणूस : हिलरी
४३. प्राणावरचा प्रवास : शिफले
४४. दानशूर कुबेर : रॉकफेलर
४५. प्रवासी पंडित : ह्युएनत्संग
४६. नृपनिर्माता : आर्य चाणक्य
४७. असामान्य क्रिकेटपटु : ब्रॅडमन
४८. लोकहिताचा संरक्षक : वि. पटेल
४९. पहिला मिशनरी : गजाननराव वैद्य
५०. तुम्हांला कोण व्हावेंसें वाटतें ?

प्रत्येक पुस्तक पन्नास नये पैसे : संच पेटी रु. २५.

व्होरा अँण्ड कंपनी पब्लिशर्स प्रायव्हेट लिमिटेड, मुंबई २.